दै. सकाळ दि. 14/07/2021

# वजिराबाद पोलिसांनी केली अट्टल गुन्हेगारास अटक

## १८ मोबाईलसह सोन्याचे दागिने जप्त

**नांदेड, ता. १३ (बातमीदार)** : वेगवेगळ्या ठिकाणावरून मोबाईल चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगारास वजिराबाद पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडील १८ मोबाईल तसेच सोन्याचे दागिने असा एकूण एक लाख ७६ हजार ४५८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून बसस्थानक, रेल्वेस्थानक, डॉक्टर लेन आदी भागातील दवाखाना आणि इतर ठिकाणी मोबाईल चोरीच्या घटना घडल्या होत्या. याबाबत वजिराबाद, शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी सूचना केल्या होत्या. त्यानुसार वजिराबादचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सूचित केले. त्यानुसार शोध सुरू असताना शनिवारी (ता. दहा) एकजण चोरीचे मोबाईल घेऊन हैदराबादला जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून पथकाने अभिलेखावरील संशयीत गुन्हेगार राजू देवीदास वाघमारे (रा. बळीरामपूर) यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे चोरीचे पाच मोबाईल मिळून आले. त्यामुळे ते जप्त करण्यात आले. त्यानंतर अधिक तपास केला असता आरोपी वाघमारे याने तेरा मोबाईल, एक सोन्याची साखळी, दोन कानातील टापसे, दोन अंगठ्या असा ऐवज काढून दिला. हा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत वजिराबाद पोलिस ठाण्यात दोन आणि शिवाजीनगर ठाण्यात एक असे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपी वाघमारे याने डॉक्टर लेन, शिवाजीनगर, कलामंदिर भागातील दवाखाना आणि इतर ठिकाणाहून चोरी केल्याचे सांगितल्याने अधिक तपास सुरू आहे. पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख, डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील अधिकारी फौजदार प्रविण आगलावे, पोलिस जमादार दत्तराम जाधव, पोलिस नायक विजयकुमार नंदे, गजानन किडे, मनोज परदेशी, चंद्रकांत बिराजदार, संतोष बेलुरोड, व्यंकट गांगुलवार, बालाजी कदम, इब्राहिम शेख, शरदचंद्र चावरे यांनी ही कार्यवाही केली.



**नांदेड : वजिराबाद पोलिसांनी एका अट्टल गुन्हेगारास पकडून त्याच्याकडील १८ मोबाईल तसेच सोन्याचे दागिने असा एकूण एक लाख ७६ हजार ४५८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावेळी पोलिस अधिकाऱ्यांसमवेत पथकातील कर्मचारी.**